क्रमांक २३२८ /ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
**दिनांक : फेब्रुवारी, २०२५**

06 FEB 2025

:: प रि प त्र क ::

**विषय :- मा.सदस्यांना देण्यात येणारी राज्यांतर्गत/राज्याबाहेरील रेल्वे कुपन पुस्तके वितरीत करण्याच्या कार्यपद्धतीबाबत.**

महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ अन्वये सर्व मा.सदस्यांना रेल्वेने विनामूल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याकरीता उक्त नियमातील नियम ३ मधील तरतूदीस अनुसरुन मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रवासासाठी प्रत्येकी ३ कुपन पुस्तकांचा संच उपलब्ध करुन दिला जातो. उक्त नियमातील नियम ८ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे:-

नियम ८ :- **कुपन पुस्तक देण्यापूर्वी करावयाच्या आवश्यक गोष्टी-** (१) सचिवाने सदस्यास कुपन पुस्तक देण्यापूर्वी, ज्या सदस्याला ते द्यावयाचे असेल त्याचे नाव त्या कुपन पुस्तकात लिहिले पाहिजे.

(२) असे कोणतेही कुपन पुस्तक देण्यापूर्वी, सचिव (अशा प्रत्येक पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छापलेल्या) पुढीलपैकी योग्य अशा एका प्रतिज्ञापत्रावर सदस्याची रीतसर सही घेईल.

उपरोक्त तरतुदीनुसार कुपन पुस्तके मा.सदस्यांनी स्वत: घेणे वा कार्यालयाने मा.सदस्यांकडे देणे आवश्यक आहे, तथापि, मा.सदस्यांची गैरसोय होऊ नये याकरीता प्रथेनुसार मा.सदस्यांच्या अधिकृत स्वीय सहायकांचे ओळखपत्र तपासून सदरहू रेल्वे कुपन पुस्तके दिली जातात. अलिकडच्या काळात मा.सदस्यांच्या अधिकृत स्वीय सहायकाऐवजी वाहनचालक अथवा अन्य त्रयस्थ व्यक्ती यांचेमार्फत मा.सदस्यांचे पत्र त्यांच्या लेटरहेडवर टंकलिखित केलेले अथवा हाती लिहिलेले सादर करुन पुस्तकांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशाप्रकारे त्रयस्थ व्यक्तीच्या हाती रेल्वे कुपन पुस्तके दिल्यास रेल्वे कुपन पुस्तकांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदर कुपन पुस्तकांच्या वापराबाबतचा हिशोब लिहून देताना अडचण निर्माण होण्याची देखील शक्यता आहे.

अत: निदेशानुसार विधानमंडळाच्या सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की यापुढे उपरोक्त नियम ८ मधील तरतुदीनुसार मा.सदस्य स्वत: अथवा केवळ मा.सदस्यांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांचे अधिकृत स्वीय सहायक त्यांच्या मूळ ओळखपत्रासह आल्यास त्यांनाच रेल्वे कुपन पुस्तके देण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

राजेश तारवी

(राजेश तारवी)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**

\\Mls-h2-06\D\D -1\2025\railwaycoupon pending note and paripatrak\paripatrak.docx